४।४४।१९
७।१।१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
नागरवस्ती विकास योजना विभाग
क्र.नावियो/१/कावि/५२८/२०१९
दि. ७ /०९/२०१९

प्रति,

**मा. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी**
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८

**विषय :- समुह संघटक या पदांवर हंगामी- मानधनावर नेमणूकीबाबत जाहीर प्रकटन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत...**

**महोदय,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात, महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांचा वस्तीपातळीवर प्रचार व प्रसार करणे, तसेच योजनांसंदर्भातील इतर सर्व कामकाजाकरीता "समुह संघटक" या अभिनामाची २० पदे सहा महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरावयाची आहेत. त्याकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून आरक्षण तक्त्यात नमूद केलेनुसार अर्ज मागविणेत येत असून, सदर पदासाठी जाहीर प्रकटन व विहीत नमुन्यातील अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर " नोकरी विषयक " येथे प्रसिध्द करणेत यावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

( उल्हास जगताप )
**सहाय्यक आयुक्त**
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**नागरवस्ती विकास योजना विभाग,**

**मुख्य प्रशासकीय इमारत - तळमजला, पिंपरी - ४११०१८.**

**समुह संघटक या पदांवर हंगामी मानधनावर नेमणूकीबाबत - (मुदत ६ महिने)**

**जाहीर प्रकटन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना अंतर्गत योजनांचा वस्तीपातळीवर प्रचार व प्रसार करणे, तसेच योजनांसंदर्भातील इतर सर्व कामकाजाकरीता "समुह संघटक" या अभिनामाची २० पदे सहा महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरावयाची असून त्याकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून आरक्षण तक्त्यात नमूद केलेनुसार अर्ज मागविणेत येत आहेत.

| पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रीत मानधन | शैक्षणिक अर्हता | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (क) | इमाव | एसईबीसी | ईड्ब्लुएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| समुह संघटक | २० | र.रु.१५,००० अधिक बाहतूक भत्ता र.रु.१,३०० | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी परिक्षा (MSW) उत्तीर्ण. २)MS Office/MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०३ | ०२ | ०५ |

**अटी व शर्ती :-**

१) प्रस्तुतच्या मानधनावर करावयाच्या नेमणूका ह्या पूर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी नेमणूकीचा हक्क सांगता येणार नाही.

२) ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

३) वर नमूद केलेल्या पदाच्या बाबतीत अर्ज करणेसाठी खुल्या वर्गासाठी वयोमर्यादा ३८ वर्षे इतकी असून मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत सदर वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील.

४) उपरोक्त पदासाठी विहीत नमुन्यातील अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला असून सदर संकेतस्थळावरील नोकरीविषयक या सदरामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी अर्ज व प्राधान्यक्रमाचा नमुना डाऊनलोड करून घ्यावा. सदर विहीत नमुन्यातील अर्ज सुवाच्च हस्ताक्षरात भरून, स्वत:चा नव्याने काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो, आधारकार्ड, वयाचा पुरावा, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, अनुभवाचा पुरावा इ. सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागात पोस्टाद्वारे अथवा समक्ष दि. २०/ ९ /२०१९ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पोहोच होतील अशा पद्धतीने पाठवावेत. सदर तारखेनंतर उशीरा येणारे अर्जांचा विचार केला जाणार नाही अथवा त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही तसेच पत्रव्यवहार केला जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी

५) प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून उमेदवारांची पात्रता यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर www.pcmcindia.gov.in प्रसिद्ध करणेत येईल.

६) पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेणेत येईल. सदर लेखी परिक्षेस येणे - जाणेकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

७) लेखी परिक्षा बहुपर्यायी एकूण ८० गुणांची असून प्रत्येक प्रश्नास २ गुण याप्रमाणे ४० प्रश्नांची घेणेत येईल. साधारणत: MSW विषयाचा अभ्यासक्रम, सामान्यज्ञान, चालू घडामोडी, वस्तीपातळीवरील कामकाजाचे ज्ञान इ. बाबींवर लेखी परिक्षा घेण्यात येईल.

८) लेखी परिक्षेचे वेळापत्रक व स्थळ मनपाचे संकेत स्थळावर (www.pcmcindia.gov.in ) प्रसिद्ध करणेत येईल व उमेदवारांचे अर्जात नमूद केलेल्या मोबाईलवर SMS द्वारे कळविण्यात येईल.

९) लेखी परिक्षेत प्राप्त झालेले गुण, संबंधित क्षेत्रातील अनुभव – कालावधी, शैक्षणिक अर्हता इ. बाबी विचारात घेऊन निवड करणेत येईल. ( लेखी परिक्षा – ९० गुण , शैक्षणिक अर्हता, अनुभव - कालावधी यानुसार १० गुण यानुसार एकुण १०० गुण निवडीसाठी ग्राह्य धरणेत येतील.)

१०) सदर पदाची निवड यादी व प्रतीक्षा यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर नंतर प्रसिद्ध करणेत येईल. सदर प्रतिक्षा यादीचा कालावधी ६ महिने राहील.

११) नेमणूक झालेल्या उमेदवारास र. रू. १००/- च्या स्टॅंप पेपरवर स्वखर्चाने हमी पत्र देणे बंधनकारक राहील.

१२) नेमणूक झालेल्या उमेदवारास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे परिसरात / नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रात व संगणकावर प्रत्यक्ष कामकाज करणे बंधनकारक राहील.

१३) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय/ आदेश/ अटी शर्ती लागु राहतील.

१४) सदरच्या नेमणूका करण्याचे अथवा रद्द करण्याचे तसेच अपरिहार्य परिस्थितीत सदरची लेखी परीक्षा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१५) नागरवस्ती विकास योजना विभाग मुख्य कार्यालय दूरध्वनी क्रमांक ०२०-६७३३-१५२६/१५२९.

तरी इच्छुक उमेदवारांनी दि. २०/९ /२०१९ पर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज व अनुषंगिक कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभाग, मुंबई – पुणे रस्ता; पिंपरी – ४११०१८. येथे पोहोच होतील अशा पद्धतीने पाठवावेत.

( संतोष पाटील )
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

जाहिरात क्र. ५५/२०१९
क्र. नावियो/१/कावि/५३०/२०१९
दिनांक ९/९ /२०१९

# अर्ज नमुना

## समुहसंघटक, नागरवस्ती विकास योजना विभाग पदासाठी

पासपोर्ट
आकाराचा फोटो

प्रति,

मा. सहाय्यक आयुक्त
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

**विषय – मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात " समुह संघटक "**
**या पदावर नेमणुकीबाबत...**

**संदर्भ –** महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या
संकेतस्थळावर प्रसिध्द झालेली जाहिरात क्र.

**महोदय,**

संदर्भिय जाहिरातीनुसार मी " **समुहसंघटक** " या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे ६ महिने कालावधीकरीता मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

( आडनाव ) ( स्वत:चे नाव ) ( वडिलांचे / पतीचे नाव )

१. संपूर्ण नाव : ----------------------------------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता ( पिनकोडसह ) : -----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------------

३. मोबाईल नं. --------------------------------------------------------------------------- ४. लिंग : स्त्री / पुरूष

५. जन्मतारीख : ----------------------------------- (DD/MM/YY) ६. वय : -----------------------------

७. जात: --------------------------------------------- प्रवर्ग : आवश्यक ठिकाणी ( √ ) अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु. जमाती | विजा अ | भज क | इमाव | एसईबीसी | ईड्ब्लुएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

८. अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील :

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | शैक्षणिक संस्था | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१. अनुभवाचा तपशील :

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता-दूरध्वनीसह | पद | कालावधी (वर्ष) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| एकूण कालावधी | | | | |

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असे ही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मानधनावरील नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्या विरूध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक : / /२०१९ अर्जदाराची स्वाक्षरी -

अर्जदाराचे नाव -

<u>पुढील क्रमाने कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत जोडाव्यात.</u>

१. जन्मतारखेचा पुरावा - शाळा सोडल्याचा दाखला / आधारकार्ड / जन्माचा दाखला इ.
२. शैक्षणिक अर्हतेची सर्व प्रमाणपत्रे.
३. सर्व शैक्षणिक अर्हतांची गुणपत्रके.
४. जातीचे प्रमाणपत्र.
५. जातपडताळणी प्रमाणपत्र. ( असल्यास )
६. अनुभवाचे प्रमाणपत्र ( संस्थानिहाय ) . ( असल्यास )